# बालकामगारांच्या कायद्यांचा अभ्यास

**प्रा. कन्नाडे ममता कार्तिक**

*राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कदमवाडी रोड, कोल्हापूर ४१६ ००३*

## प्रस्तावना

सर्वसामान्यपणे १४ वर्षापेक्षा कमी वयाची मुले ही बालक या संज्ञेस पात्र ठरतात. पंडित नेहरूनी देशाचे भावी आधारस्तंभ म्हणून बालकांचे महत्व अचूक ओळखले होते. बालपण प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातील अनमोल देणगी आहे. बालपण म्हणजे व्यक्तीच्या जीवनातील सोनेरीच दिवस असतात. पण असा हा काळ सुखाचा लाभणे हे देखील नशीबात असावे लागते, कारण जेव्हा आपण घराबाहेर पडून समाजात वावरतो तेव्हा अनेक ठिकाणी लहान मुले काम असताना आपणास दिसतात. या शोधनिंबंधामध्ये भारतीय राज्यघटनेतील बालमजुरीसबंधी असलेल्या तरतुदी, बालकामगारांच्या संदर्भात उपलब्ध असलेले कायदंयाचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

## भारतीय राज्यघटनेतील बालमजुरीसंबधी तरतूदी :

भारतीय राज्यघटनेमधील मूलभूत हक्क आणि राज्याची मार्गदर्शक तत्वे यातून बालकांच्या हक्कांना कायदेशीर पाठिंबा मिळालेला आहे. या राज्यघटनेतील तत्वे सर्व नागरिकांना तसेच व्यक्तींना लागू असल्यामुळे सर्व मुलांनाही ती लागू आहेत असे मानले पाहिजे. घटनेतील मूलभूत हक्कांची कायदेशीर अंमलबजावणी होऊ शकते. पण राज्याच्या मार्गदर्शक तत्वांचे तसे नाही. घटनेतील कलम ३७ नुसार ही मार्गदर्शक तत्वे देशाच्या शासनासाठी मूलभूत समजलेली असून या तत्वांचा आधार घेऊन कायदे करण्याची जबाबदारी शासनावर ठेवलेली आहे.

## घटनेतील बालमजुरीसबंधी महत्वाची कलमे खालीलप्रमाणे आहेत:

भारतीय राज्यघटनेने मुलांना त्यांचे अधिकार अबाधित ठेवण्यासाठी **कलम १४** मध्ये तरतुद केली आहे. यामध्ये असे स्पष्ट केले की, कायद्यासमोर सर्व समान आहेत व कायद्याने सर्वांना समान संरक्षण मिळते.

**कलम १५–** कोणत्याही प्रकारचा कोणामध्येही भेदभाव करता येणार नाही.

**कलम २१ अ –** कलम २१ अ नुसार शिक्षण हा ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक मुलाचा मुलभूत अधिकार आहे.

**कलम २४ –** चौदा वर्ष वयाखालील कोणत्यास बालकास, कोणत्याही कारखान्यात किंवा खाणीत काम करण्यासाठी नोकरीत ठेवले जाणार नाही अथवा कोणत्याही धोक्याच्या कामावर त्यास लावले जाणार नाही.

**कलम २३–** शोषणाविरूध्द अधिकार

**कलम ४५–** राज्य सर्व बालकांसाठी त्यांच्या वयाची सहा वर्ष पूर्ण होईपर्यत, प्रारंभिक बाल्यावस्थेतील देखभाल आणि शिक्षण यांची तरतूद करण्याकरिता प्रयत्न करील (म्हणजेच ०–६ वर्षाखालील सर्व मुलांना सक्तीचे मोफत शिक्षण मिळाले पाहिजे.)

**कलम ३९ ई नुसार –** कोवळया वयाच्या मुलांचा गैरवापर केला जाऊ नये आणि त्यांचे वय लक्षात घेऊन त्यांच्या क्षमतेला झेपणार नाही अशा ठिकाणी त्यांना काम करण्याची सक्ती करू नये.

**कलम ३१ फ–** मुलांची सुदृढ निरोगी वाढ होण्यासाठी त्यांना पोषक वातावरणात आपला विकास करण्याची संधी

दिली पाहिजे आणि वाढीस आवश्यक अशा सुविधा पुरवल्या पाहिजेत. त्यांचे बाल्य जपले आणि जोपासले पाहिजे.

**कलम ४३–** राज्य, यथायोग्य विधिविधानाद्वारे किंवा आर्थिक सुसंघटन करून अथवा कोणत्याही मार्गाने शेतकी, औद्योगिक अथवा अन्य प्रकारच्या सर्व कामगारांना काम, निर्वाह वेतन, समुचित जीवनमान आणि फुरसतीचा आणि सामाजिक व सांस्कृतिक संधीचा पूर्ण उपयोग करून देंण्यासाठी प्रयत्नशील राहील.

राज्यघटनेच्या विविध प्रकरणात ही कलमे आहेत. कलम १४ ते कलम २४ हा मुलभूत अधिकार आहे. आणि कोर्टामार्फत त्याची अंमलबजावणी करता येते. कलम ३९ ई व फ व कलम ४५ ही भारतीय राज्यघटनेच्या राज्यासाठीच्या मार्गदर्शकराज्यघटनेच्या विविध प्रकरणात ही कलमे आहेत. थोडक्यात २४ व्या कलमाचे उल्लंघन झाले तर न्यायालय राज्यास या कलमाची अंमलबजावणी न केल्याबद्दल जबाबदार ठरविते. परंतु कलम ३९ 'ड', 'च' व ४५ ही फक्त मार्गदर्शक असल्यामुळे राज्यांवर यांची जबाबदारी लादता येईलच असे नाही. तरीही ब–याच खटल्यामध्ये मार्गदर्शक तत्वे ही मूलभूत हक्कांना पूरक असून दोन्हीही एकत्रितपणे अंमलात आणली पाहिजेत असा निवाडा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.[१]

### ६.३ भारतात बालमजुरी सबंधी असलेले कायदे:

भारतामध्ये स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यानंतर वेळोवेळी अनेक कामगार कायदे केले आहेत व कामगारासाठी अनेक तरतुदीही करण्यात आल्या आहेत.

### १. १८८१ चा फॅक्टरी ॲक्ट–

१८८१ मध्ये पहिला फॅक्टरी ॲक्ट कायदा करण्यात आला. हा कायदा १०० किंवा त्यापेक्षा अधिक कामगार असणा–या कारखान्यांना लागू करण्यात आला. या कारखान्यात काम करण्यासाठी मुलाचे वय कमीत कमी सात वर्ष असणे आवश्यक होते. तसेच एकाच दिवशी दोन कारखान्यात मुलांना पाठोपाठ मजूरीला बंदी घालण्यात आली होती. आणि एका दिवसामध्ये ९ तासाहून अधिक तास कामावर ठेवण्यास बंदी होती व प्रतिमाह किमान ४ दिवस सुट्टीची तरतूद होती. यामध्ये १८९१ मध्ये काही सुधारणा करण्यात आली व नवीन फॅक्टरी ॲक्ट कायदा तयार करण्यात आला. [२]

### २. १९११ फॅक्टरी ॲक्ट –

फ्रिअर स्मिथ समिती (१९०६) आणि कारखाने श्रम आयोग (१९०७) यांनी कारखान्यातील कामगारांच्या स्थितीचे अन्वेषण करून केलेल्या शिफारशींच्या आधारे नवीन कारखाने विधेयक सादर करण्यात आले व या विधेयकाचे रूपांतर १९११ मध्ये भारतीय कारखाने कायद्यात करण्यात आले. या कायद्यानुसार दिवसाकाठी सहा तासापेक्षा जास्त वेळ काम करण्यास मुलांना प्रतिबंध करण्यात आला. तसेच नोकरीसाठी वय व शारीरिक क्षमता यासाठी वैद्यकीय अधिका–याचे प्रमाणपत्र अनिवार्य करण्यात आले. तसेच धोक्याच्या कामात बालमजुर घेण्यावर बंदी घालण्यात आली आणि रात्री ७ ते सकाळी ५.३० वाजेपर्यंत बालकामगारांना बंदी घालण्यात आली.[३]

**आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेने (ILO) केलेले बदल–**

भारत देश हा आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेचा (International Labour organization) एक संस्थापक सदस्य देश आहे. भरत हा १९१९ मध्ये आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेने बालकामगार प्रथेविरूध्द पास केलेल्या पहिल्या करारावर सही करणारा देश आहे. तेंव्हापासून भारतात बालकामगारसबंधी अनेक कायदे केले गेले आहेत. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेने बालकामगार सबंधी १८ करार व १६ शिफारशी स्वीकारल्या आहेत. बालकामगारासंबधी ILO ने जे कायदे केले त्यामध्ये प्रमुख चार गोष्टीवर भर देण्यात आले.

१. बालकांना कामावर ठेवण्याचे किमान वय

२. दिवसा अधिक वेळ काम करण्यास व रात्रीच्या कामावर बंदी

३. बालकांच्या विशिष्ट प्रकारचे काम करण्यावर बंदी

४. काम करणा–या प्रत्येक बालकाची वैद्यकीय तपासणी

ILO च्या या करारानुसार १९२२ च्या फॅक्टरी ॲक्टमध्ये तरतूदी करण्यात आल्या सुधारणा झाली.[४]

**३. १९२३ खाणमजूर कायदा –**

१९२३ च्या खाणमजूर कायद्याने बालकामगारांची वयाची मर्यादा वाढविण्यात आली. या कायद्यान्वये बालकामगाराचे वय १२ वर्षावरून १३ वर्ष करण्यात आले. [५]

**४. १९३२ चा चहाच्या जिल्हयाकरिता कायदा–**

१९३२ मध्ये चहाच्या जिल्हयांमधून स्थानांतरीत होणा–या मजुरांबद्दल हा कायदा करण्यात आला. या कायद्यानुसार १५ वर्षावरील मुलांना कामावर ठेवण्यात यावे किंवा १५ वर्षापेक्षा कमी वयाची मुले फक्त आपल्या आई–वडील किंवा पालकासोबतच येऊ शकतात अशी तरतुद करण्यात आली. [६]

**५. १९३३ चा बाल मजूर कायदा–**

रॉयल कमिशनने केलेल्या शिफारशी नुसार १९३३ साली बाल मजुर कायदा करण्यात आला. या कायद्यानुसार कर्ज किंवा अग्रिम राशी मिळण्याच्या हेतूने बालकामगारांचे श्रम गहाण ठेऊन नंतर कारखानदारांनी बाल कामगाराकडून काम करवून घेण्याच्या प्रथेला बेकायदेशीर ठरविण्यात आले. या कायद्याने मुलांना कामासाठी गहाण ठेवण्यावर बंदी घालण्यात आली. ख–या अर्थाने बालकामगार विरोधी कायद्याची सुरवात या कायद्यापासूनच झालेली दिसून येते. यापूर्वी १८८१ मध्ये फॅक्टरी ॲक्ट कायदा करण्यात आला होता पण हा कायदा १०० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार असणा–या कारखान्यालाच लागू करण्यात आला होता. [७]

**६. १९३४ फॅक्टरी ॲक्ट–**

या कायद्याने १२ वर्षा खालील बालकाला कामावर ठेवण्यास बंदी घातली होती. तसेच १२ वर्षावरील म्हणजे १२ ते १५ वर्षापर्यतच्या मुलाचे कामाचे तास ५ तासापेक्षा जास्त असू नये तसेच १५ ते १७ वर्ष वयाच्या मजुराबाबत या कायद्याने विशिष्ट नियंत्रणे लादली होती. [८]

**७. १९३५ खाणमजूर कायदा (सुधारीत) –**

या कायद्यान्वये १५ वर्षाखालील बालकाला खाणमजूर म्हणून घेण्यास बंदी घालण्यात आली होती. तसेच १५ वर्ष ते १७ वर्ष वयोगटातील मुलांना खाणीच्या आत काम देताना वैद्यकीय अधिका—याकडून आरोगयाचा दाखला घेणे बंधनकारक होते. एका आठवडयात ५४ तास आणि व खाण कामात ९ तासापेक्षा जास्त काम करण्यास मुलांना बंदी घालण्यात आली होती. [९]

### ८. १९३८ बालमजुरांचा कायदा—

आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या २३ व्या अधिवेशनात १९३७ मध्ये पास झालेल्या करारानुसार भारतासाठी खास उल्लेख करुन तयार केलेले कायदे, जी कामे माल डाक, यात्री यांना रल्वे परिसर किंवा बंदरात ने—आण करणे किंवा इतर वाहतुकीची कामे याकरिता १३ वर्षे वयाखालील मुलांना रोजगारास बंदी करण्यात आली. आणि १५ वर्षाखालील मुलांना आरोग्याला घातक असणा—या कामासाठी मजूरी देण्यास बंदी घालण्यात आली. बाल कामगारांना संरक्षण मिळवून देण्याच्या दृष्टीने हा कायदा फार महत्वाचा मानला जातो. हया कायद्यामधील महत्वाच्या तरतुदी पुढील प्रमाणे आहेत—

१. १५ वर्षापेक्षा कमी वय असलेल्या कोणत्याही बालकाला रेल्वे, प्रवासी किंवा वाहतुकीशी सबंधित इतर व्यवसायामध्ये तसेच बंदराच्या सीमेच्या आत माल उचलणे किंवा ठेवणे हया कामावर लावता येणार नाही.

२. या कायद्यानुसार १० उद्योगामध्ये १४ वर्षाखालील मुलांना काम देऊ नये असा नियम आहे. या उद्योगाच्या यादीमध्ये विडया तयार करणे, गालीचे विणणे, सिमेंट तयार करणे व त्याची पोती भरणे, रंग तयार करणे व विणकाम, आगकाडया तयार करणे, स्फोटके व दारूगोळा, मायका कटिंग व लाकूड कटाई, साबण, ॲसिड तयार करणे व लोकर स्वच्छ करणे इत्यादी कामाचा समावेश करण्यात आला आहे. [१०]

### ९. फॅक्टरी ॲक्ट १९४७—

हया कायद्याने १४ वर्षाखालील मुलांना कुठल्याही फॅक्टरीत काम करण्यास बंदी घातलेली आहे. ज्या आस्थापनेत १० किंवा जास्त कामगार उर्जा वापरून किंवा २० किंवा त्याहून जास्त कामगार उर्जेशिवाय काम करतात, त्याला फॅक्टरी म्हटले आहे. १४ ते १८ वयोगटातील मुलांच्या कामाच्या सेवाशर्ती नियंत्रित केल्या आहेत. त्यांना रात्री काम करण्यास बंदी घातली असून कामाची वेळ ही जास्तीत जास्त साडेचार तासांची ठेवली आहे. त्यांना धोकादायक यंत्राजवळ काम करण्यास बंदी घातली असून आरोग्याचा दाखला बाळगणे आवश्यक आहे. [११]

### स्वातंज्योत्तर काळातील कामगार कायदे —

### १०. १९४८ चा फॅक्टरी ॲक्ट —

स्वातंत्र्यपूर्व काळातील कारखाने कायदा बालकामगार प्रथेला आळा घालण्यात परिणामकारक ठरला नाही म्हणून भारतातील पहिल्या राष्ट्रीय सरकारने स्वातंत्र्यपूर्वकाळातील भारतातील कारखाने कायद्यांचा आढावा घेऊन १९४८ मध्ये नव्यानेच कारखाने कायदा करण्यात आला. भारतातील सर्व राज्यांना हा कायदा लागू करण्यात आला. वयाची १४ वर्षे पूर्ण न केलेल्या कोणत्याही मुलास कारखान्यात नोकरीस लावण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. १४ ते १८ वर्ष वयादरम्यानच्या व्यक्तींना कारखान्यातील नोकरीसाठी वैद्यकीय अधिका—याचे शारीरिक दृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक करण्यात आले आहे. १४ ते १५ वर्ष वयादरम्यानच्या मुलांसाठी कामाचे तास

साडेचार तासापेक्षा अधिक असू नये असा दंडक घालण्यात आला आहे. म्हणजे १९४८ च्या कारखाने कायद्याने १८ वर्ष वयावरील व्यक्तींची गणना 'प्रौढ' म्हणून केली जाते. यानुसार १४ वर्ष वयाखालील कोणत्याही मुलास कारखान्यात काम करण्यास निर्बध घालण्यात आले आहे. [१२] धोकादायक यंत्रावर काम करण्यास मुलांना मनाई करण्यात आली आहे. प्रत्येक मुलास कारखान्याच्या एकाच पाळीत नोकरीस ठेवावे, ३० दिवसात एकदाच यात बदल व्हावा असे बंधन घालण्यात आले आहे. एकाच दिवशी दोन वेगवेगळया कारखान्यामध्ये मुलांना नोकरीस ठेवू नये असे निर्बंध घालण्यात आले आहेत. मुलांच्या बाबतीत, कारखान्यातील कामाची वेळ सकाळी ८.०० ते सायंकाळी ७.०० या दरम्यान असावी, असा दंडक घालण्यात आला आहे. दैनिक कामाच्या कालावधीत मध्यांतराची विश्रांतीची सुट्टी या तरतुदी कायद्यात करण्यात आल्या आहेत.

**११. १९५१ बालमजूरी कायदा (सुधारणा)–**

आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या (ILO) करारानुसार रात्रपाळीचे काम करणा—या मुलाबाबत १५ ते १७ वर्ष वयातील मुलांना रेल्वे, बंदरे इथे रात्र पाळीवर काम करण्यास बंदी तसेच १७ वर्षापर्यंत वय असलेल्या मुलांचे नावे रजिष्टर मध्ये नोंदणे आवश्यक आहे.

**१२. खाणकाम कायदा १९५१:**

या कायद्यान्वये १५ वर्षाखालील मुलांना खाणीत रोजगार देण्यास बंदी घालण्यात आली. १५ ते १८ वर्ष वयादरम्यान मुलांना शारीरिकदृष्टया सक्षम असल्याचे वैद्यकीय अधिका—याचे प्रमाणपत्र त्यांच्याजवळ असल्याशिवाय नोकरी करण्यास मनाई करण्यात आली. तसेच साडेचार तासापेक्षा अधिक तास काम करून घेण्यास मनाई करण्यात आली आहे. [१३]

**१३. १९५४ फॅक्टरी अॅक्ट (सुधारीत):**

१९४८ च्या कायद्यात सकाळी ८ ते सायं. ७ पर्यंत कामाची परवानगी होती. या कयद्याने १७ वर्षाखालील मुलांना रात्रपातळीवर रोजगार देण्यास बंदी करण्यात आली म्हणजे रात्री १० ते सकाळी ७ पर्यंत मुलांना रोजगार देण्यास प्रतिबंध करण्यात आला. [१४]

**१४. मर्चंट शिपिंग अॅक्ट (व्यापारी—जहाज वाहतूक कायदा) १९५८:**

व्यापारी जहाज काय़द्यान्वये १४ वर्ष वयाखालील मुलांना जहाजावर कोणत्याही प्रकारची नोकरी करण्यास मनाई करण्यात आली आहे. परंतु हा नियम प्रशिक्षण देणा—या जहाजासंदर्भात लागू होत नाही. तसेच ज्या जहाजावर कुटुंबातले सदस्य नोकरी करित असतील अशा जहाजावर करणा—या मुलांसाठी हा नियम लागू होत नाही. तसेच शारीरिक दृष्टया सक्षम असल्याचे मान्यताप्राप्त वैद्यकीय अधिका—याचे प्रमाणपत्र असल्याशिवाय १८ वर्षाखालील मुलांना जहाजावर नोकरी करण्यास मनाई करण्यात आली आहे. [१५]

**१५. प्रशिक्षणार्थी कायदा १९६१:**

या कायद्यान्वये १४ वर्ष पूर्ण व्हायच्या आत व शारीरिक क्षमतेची अट पूर्ण न करणा—या कोणत्याही मुलाला प्रशिक्षणार्थी म्हणून अयोग्य ठरविलेले आहे. तसेच एक आठवडयात प्रशिक्षणाचा कालावधी ४२ ते ४८ तासापेक्षा

जास्त नको असे स्पष्ट करण्यात आले आहे. प्रशिक्षणाच्या तीस–या वर्षी मात्र इतर कामगारांएवढे तास तो काम करू शकतो. [१६]

## १६. बिडी व सिगार मजूर कायदा १९६६:

**कलम –२४:** सदर कायद्यान्वये १४ वर्ष पूर्ण न केलेल्या मुलांना बिडी व सिगारेट उत्पादनाच्या कंपाऊडमध्ये कोणतेही काम, रोजगार देण्यावर संपूर्ण बंदी घालण्यात आली.

**कलम –२५:** १४ ते १८ वर्ष वयोगटातील मुलांना कोणत्याही औद्योगिक क्षेत्रात सकाळी ६ ते सायंकाळी ७ ते सकाळी ६ पर्यंत नोकरी करण्यास प्रतिबंध करण्यात आले

**कलम –१७ :** कोणत्याही मुलाला जादाचे काम (ओवर टाईम) करण्यास प्रतिबंध करण्यात आला. [१७]

## १७. प्रशिक्षणार्थीचा (सुधारित) कायदा, १९७३:

१९६१ च्या प्रशिक्षणार्थीचा कायदा, १९७३ मध्ये सुधारण्यात आला. कोणतेही मुल किमान १४ वर्षे वयाची असल्याशिवाय आणि त्याच्याजवळ शारीरिक दृष्टया सक्षम असल्याचे मान्यताप्राप्त वैद्यकीय अधिका–याचे प्रमाणपत्र असल्याशिवाय प्रशिक्षणार्थी म्हणून प्रशिक्षण घेण्यास अपात्र ठरविण्यात आले आहे. तसेच प्रशिक्षणाचे आठवडयाचे कामाचे तास पहिल्या वर्षी ४२ ते ४८, दुस–या वर्षी ४२ ते ४५ आणि तिस–या वर्षापासून नियमित काम करणा–या कामगाराइतके असतील असे या कायद्यात स्पष्ट करण्यात आले आहे. [१८]

## १८. वेठबिगारी निर्मुलन (ॲबॉलिशन) कायदा १९७६:

या कायद्यान्वये वेठबिगारीतून मुक्त झालेल्या मुलांच्या पुर्नवसनाची आणि मदतीची जबाबदारी राज्यावर दिलेली आहे. हया कायद्याच्या कलम १४ (ब) नुसार 'दक्षता समितिन्वये' आर्थिक तसेच सामाजिक पुनर्वसन करण्याची तरतुद केलेली आहे. निरजा चौधरी विरूध्द मध्यप्रदेश राज्य हया निवाडयात सर्वोच्च न्यायालयाने वेठबिगारीतून मुक्त झालेल्या कामगारांचे सुयोग्य पुर्नवसन त्यांची मुक्तता याची जबबाबदारी राज्यावर दिलेली आहे तसे न केल्यास घटनेतील कलम २१( स्वातंत्र आणि जगण्याचा हक्क) आणि कलम २३ (वेठबिगारीचे निर्मूलन) त्यांचे ही उल्लंघन होते असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे. हा कायदा वेठबिगारीत अडकलेल्या मुलांनाही लागू असल्यामुळे अशा सुटका झालेल्या मुलांच्या पुनर्वसनासाठी असलेला एकमेव कायदा आहे. [१९]

## १९. बालकामगार (प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा १९८६:

या कायद्यास संसदेच्या अध्यक्षांनी दिनांक २३ डिसेंबर १९८६ रोजी मान्यता दिली असून तो त्याप्रमाणे प्रकाशित झाला. राज्यातील १५ जिल्हयांमध्ये बालकामगारांच्या पुर्नवसनासाठी 'राष्ट्रीय बालकामगार योजना' राबवण्यात आलेली आहे. वय वर्ष १४ खालील मुलांना कामावर ठेवण्यात प्रतिबंध करणे, हे या अधिनियमाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. विशेषत: १४ वर्षाखालील कोणत्याही मुलांना धोकादायक उद्योगांमध्ये व हानिकारक प्रक्रियांमध्ये कामावर ठेवण्यास प्रतिबंध करतो. त्याचप्रमाणे तो मुलांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यास हानिकारक मानले गेलेले १६ व्यवसाय व धोकादायक समजल्या गेलेल्या ६५ प्रक्रियांध्ये मुलांना कामावर ठेवण्यास मनाई करतो. तसेच ज्या आस्थापनामध्ये मुलांना कामावर ठेवण्यास परवानगी देण्यात आलेली आहे, अशा सर्व कारखान्यांवर हा अधिनियम नियंत्रण ठेवतो. दोषीवर कडक दंडात्मक कारवाई करण्याच्या किंवा तरूंगवासाच्या शिक्षा देण्याच्या तरतुदीही

त्यामध्ये आहेत. मात्र या अधिनियमाच्या कक्षेमधून कुटूंब व प्रशिक्षण संस्थाना वगळण्यात आलेले आहे. नियमभंग करणा—यांना ३ महिन्यापसून ते १ वर्षापर्यंत तुरूंगवास व त्यासोबत रू. १०,००० ते २०,०००/— दंड होऊ शकतो राज्यातील १५ जिल्हयांमध्ये बालकामगारांच्या पुनर्वसनासाठी 'राष्ट्रीय बालकामगार योजना' राबवण्यात आलेली आहे. या कायद्यानुसार खालील व्यवसाय व प्रक्रियेत १४ वर्षाच्या आतील मुलांना काम करण्यास पूर्णत: बंदी आहे.

ज्या व्यवसाय व प्रक्रियेत मुलांना काम करण्यास बंदी आहे त्या ठिकाणी मुलांच्या कामाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे दिल्या आहेत—

- मुलांना आस्थापनेने निश्चित केलेल्या तासांपेक्षा जास्त काम करण्याची परवानगी नाही.
- कोणत्याही बालकाने तीन तासापेक्षा जास्त काम करावयाचे नाही. तसेच त्याने त्या कामापूर्वी तीन तासांची विश्रांती घेतलेली असणे आवश्यक आहे.
- विश्रांतीचा कालावधी, कामाचा कालावधी व इतर वाया जाणारा वेळ धरूण एकूण कामाचा कालावधी हा सहा तासापेक्षा जास्त असता कामा नये.
- मुलांना संध्यकाळी ७ ते सकाळी ८ पर्यंत काम करण्याची परवानगी नाही.
- मुलांना अतिरिक्त वेळ काम करायची परवानगीही नाही. मुलांना दोन व्यवस्थापनामध्ये एकाच वेळी काम करावयाची परवानगी नाही.
- प्रत्येक बालकामगाराला आठवडयात एक पूर्ण दिवस सुट्टी व्यवस्थापनाने ज्या दिवशी ठरवलेली असेल ती घेण्याची परवानगी आहे.
- ज्या व्यवस्थापनात बाल कामगार काम करीत असतील तेथे त्यांनी रजिस्टर ठेवणे गरजेचे असून कामाच्या कोणत्याही वेळात इन्स्पेक्टर त्यांची तपासणी करू शकतात. त्या रजिस्टरमध्ये खालील नोंदी असणे आवश्यक आहे.
- प्रत्येक बालकामगाराचे नांव, वय, जन्मतारीख
- कामाचा कालावधी, तास व विश्रांतीचा कालावधी
- त्याच्या कामाचे स्वरूप आणि इतर बाबी ज्या गरजेच्या आहेत

**शिक्षा /दंड—**

- जो कोणी कलम ३ च्या विरोधात बाल कामगारांनी काम करण्यास परवानगी देईल त्यास तीन महिने ते एक वर्षापर्यत तुरूंग वासाची शिक्षा होऊ शकते. तसेच १० हजार ते २० हजार रूपये पर्यंत दंड होऊ शकतो किंवा दोन्ही एका वेळी होऊ शकतो.
- जो व्यक्ती दुस—यांदा गुन्हा केला असेल तर त्याला सहा महिने ते दोन वर्षापर्यंत तुरूंगवासाची शिक्षा होऊ शकते.

● जो व्यक्ती कलम ९ प्रमाणे नोटीस देणार नाही. कलम ११ प्रमाणे रजिस्टर ठेवणार नाही किंवा खोटया नोंदी करेल, कलम ३ प्रमाणे नोटीस प्रकाशीत करणार नाही, तसेच कलम १२ प्रमाणे वागणार नाही किंवा सदरील कायद्याच्या विरोधात वागेल तो एक महिन्याच्या तुरूंगवासाच्या शिक्षेस पात्र ठरेल किंवा दहा हजार रूपये दंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल किंवा दोन्ही शिक्षेस पात्र ठरेल [२०]

**२०. बाल न्याय (बालकाची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०००:**

बाल न्याय (बालकांची काळजी व संरक्षण) (सुधारणा) अधिनियम, २००६ (दिनांक २२ ऑगस्ट २००६ रोजी अमलात आला) काही कारणांमुळे वाममार्गाला गेलेल्या अपचारी बालक, अनाथ व उपेक्षित असलेल्या बालकांची काळजी घेण्याची व संरक्षण करण्याची गरज असलेल्या बालकांची योग्य प्रकारे काळजी घेणे, त्यांचे संरक्षण करणे व त्यांच्यावर उपचार करणे यासाठी तरतूद करण्याकरता, त्यांच्या विकासविषयक गरजा पुरविण्याकरता आणि बालकांच्या सर्वोत्तम हिताच्या सबंधातील बाबींच्या अभिनिर्णयामध्ये व व्यवस्थेमध्ये बालकी हिताचा दृष्टिकोन स्वीकारण्यासाठी आणि त्यांचे कायस्वरूपी पुर्नवसन करण्याकरिता तद्सबंधातील कायद्याचे एकत्रीकरण करण्यासाठी व त्यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम प्रस्थापित करण्यात आला. [२१]

**२१. बालकांसाठी राष्ट्रीय सनद, २००३ :**

कोणतेही बालक भुकेलेले, निरक्षर किंवा आजारी राहू नये हे पाहण्याच्या दृष्टीने बालकाची व्यवस्था करण्याच्या आपल्या बांधीलकीचा पुनरूच्चार करण्याकरता बालकांसाठी एक राष्ट्रीय सनद स्विकारण्यात आली. या सनदेच्या मुळाशी असा उद्देश आहे की, प्रत्येक बालकासाठी बालक असण्याच्या आपल्या वारसा हक्काची सुनिश्चिती करणे आणि बालकांची आरोग्यपूर्ण वाढ व विकास नाकारणारी मूळ कारणे विचारात घेऊन त्यांना अरोग्यपूर्ण व आनंदी बाल्यावस्था उपभोगू देणे, आणि कुटुंबाचे समाजाचे व राष्ट्राचे बळकटीकरण करणे होय. [२२]

२२. **बालहक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ सन (२००६ चा अधिनियम क्रं.४) (२०जानेवारी २००६) :**

बालकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी एक राष्ट्रीय आयोग व राज्य आयोग आणि बालकांच्या विरोधात केलेल्या अपराधांची किंवा बालकांच्या हक्कांचे उल्लंघन केल्याबाबतची जलदगतीने न्यायचौकशी करण्याची तरतूद करण्यासाठी बाल न्यायालये गटीत करण्याकरिता आणि तत्सबंधित किंवा तदनुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम करण्यात आले.

**२३. राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोग नियम, २००६:**

या आयोगान्वये कलम १३ च्या पोट–कलम (क) ते (ब) द्वारे त्याच्याकडे सोपविलेल्या कामांशिवाय बालकांच्या हक्कांवरील अभिसंधीचे अनुपालन करण्यासाठी विद्यमान कायदे, धोरणे व पध्दतीचे विश्लेषण करणे, या धोरणाचे किंवा पध्दतीने बाधित होणा–या बालकांच्या कोणत्याही घटकाबाबत चौकशी हाती घेणे व त्याचा अहवाल सादर करणे आणि बालहक्काच्या सबंधातील प्रस्तावित नवीन कायद्यावर भाष्य करणे, बालकांच्या हक्काबद्दलची माहिती तयार करणे व तिचा प्रसार करणे, बालकाबाबतची माहिती संकलित करणे व तिचे विश्लेषण करणे. [२३]

**२४. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९:**

**(२००९ चा अधिनियम क्रमांक ३५) कलम चार– सहा ते चौदा वर्षाच्या सर्व बालकांसाठी मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतूद करण्यासाठी अधिनियम –**

सहा वर्षापेक्षा अधिक वयाच्या बालकाने कोणत्याही शाळेत प्रवेश घेतलेला नसेल किंवा असेल, परंतु त्याला किंवा तिला आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण करता आले नसेल तेव्हा त्याला किंवा तिला, त्याच्या किंवा तिच्या वयास अनुरूप असलेल्या वर्गात प्रवेश देण्यात येईल. परंतु एखादया बालकाने, त्याच्या किंवा तिच्या वयाच्या अनुरूप असलेल्या वर्गात थेट प्रवेश घेतलेला असेल तेव्हा त्याला किंवा तिला विहित करण्यात येईल अशा रीतीने किंवा अशा कमाल मर्यादित इतर बालंकाबरोबरच विशेष प्रशिक्षण मिळण्याचा हक्क असेल, परंतु प्राथमिक शिक्षणासाठी ज्या बालकास अशा रीतीने प्रवेश देण्यात आलेल्या असेल अशा बालकास ते चौदा वर्ष वयाचे झाल्यानंतर देखील, प्राथमिक शिक्षण पूर्ण करेपर्यंत मोफत शिक्षण मिळण्यांचा हक्क असेल. [२४]

**कलम ५ दुस–या शाळेत प्रवेश घेण्याचा हक्क–**

एखाद्याा शाळेत प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याची कोणतीही तरतूद नसेल तेव्हा बालकाम शिक्षण पूर्ण करण्याकरिता कोणत्याही शाळेत प्रवेश देण्याची मागणी करण्याचा हक्क आहे. एखाद्या बालकास, कोणत्याही कारणामुळे राज्यात किंवा राज्याबाहेरच्या शाळेत प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्यासाठी कलम २ च्या खंड च्या (न) च्या उपखंड (तीन) व (चार) यामध्ये निर्दिष्ट केलेली शाळा वगळून, इतर कोणत्याही शाळेत प्रवेश देण्याची मागणी करण्याचा हक्क असेल.

**२५. बाल न्याय कायदा (काळजी आणि संरक्षण) अधिनियम २०१५–**

बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) अधिनियम २००० अंमलबजावणीला पंधरा वर्षे झाली. या दरम्यान या कायद्यामध्ये सन २००६ मध्ये सुधारणा करण्यात आली आणि आता २०१५ मध्ये हा कायदाच पुनर्गठीत करण्यात आलेला आहे. या कायद्यातील कलम ७९ (बालकामगारांची पिळवणूक) नूसार कोणत्याही प्रचलीत कायद्यामध्ये बालकामगारांच्या पिळवणूकी संबंधी किंवा त्यांच्या अन्यायासबंधी किंवा त्यांच्या नोकरीतील वेठबिगारी सबंधी किंवा बालकामगारांची मिळकत किंवा उत्पन्नाचा वापर तो मालक (नियोक्ता) स्वत:च्या उपयोगाकरिता किंवा अन्य उपयोगाकरिता करित असेल तर त्याना पाच वर्षे कालावधीची कठोर अशी तुरूंगवासाची शिक्षा किंवा एक लाख रूपये दंडास जबाबदार राहील अशी तरतूद करण्यात आली.

या कलमान्वये नोकरी मध्ये माल व सेवा विक्री यांचा समावेश होतो. तसेच सार्वजनिक ठिकाणी आर्थिक लाभाकरिता, करमणूक करण्याकरिता बालकामगारांची नेमणूक याचाही समावेश होतो. [२५]

**बालकामगार कायद्यामध्ये झालेले बदल :**

भारतामध्ये १८८१ पासून बालकामगार विरोधी वेगवेगळे कायदे करण्यात आले आहेत. १९८२ मध्ये बालकामगारांसाठी३०० कायदे करण्यात आले होते.[२६] तसेच भारतीय संविधान मध्येही बालकांचे हक्क अबाधित रहावे यासाठी तरतूद केलेली असली तरीही या गोष्टीला पूर्णयश आले असे म्हणता येणार नाही. कारण बालकामगारांनी केलेले कोणतेही काम की, ज्याचा मोबदला मिळो अथवा न मिळो कामात सहभागी होणा–या

प्रत्येक मुलास बालकामगार म्हणतात. असा निष्कर्ष रिपोर्ट ऑफ कमिटी ऑन चाईल्ड लेबर यांनी मांडला आहे.[२७]
इ.स.१८८१ च्या फॅक्टरी ॲक्टनुसार बालकामगाराचे वय कमीत कमी सात वर्ष असे होते व एका दिवसामध्ये ९ तासाहून जास्त तास काम करून घेण्यास बंदी होती. १९९१ मध्ये बालकामगाराचे वय ९ वर्ष करण्यात आले. १९०१ च्या खाणकामगार कायद्यानुसार बालकामगाराचे वय १२ वर्ष करण्यात आले नंतर खाणमजूर कायदा (१९२३) मध्ये संमत झाला व या कायद्यानुसार बालकामगाराचे वय एक वर्षानी वाढविण्यात आले म्हणजे १३ वर्ष करण्यात आले नंतर १९३२ मध्ये (चहाच्या जिल्हयाकरिता कायदा) मुलाच्या कामाचे वय १५ वर्ष करण्यात आले किंवा १५ वर्षापेक्षा कमी वयाची मुले फक्त आपल्या आई–वडील किंवा पालकासोबतच येऊ शकतात अशी तरतुद करण्यात आली. नंतर फॅक्टरी ॲक्ट (१९३४) व खाणमजूर कायदा १९३५ मध्ये बालकामगाराचे वय १५ ते १७ असे ठरविण्यात आले व १९३८ मध्ये (बालमजूरांचा कायदा) वयाची अट १५ वर्ष करण्यात आली. यानंतरच्या कायद्यात बालकामगाराचे वय १४ वर्षाखालील असे ठरविण्यात आले.

१९८६ च्या कायद्यान्वये मुलांना धोकादायक उद्योगात काम करण्यास प्रतिबंध करण्यात आले कारण त्या ठिकाणी काम केल्यानंतर मुलांना फुपुसाचा आजार होण्याची शक्यता असते. या कामामध्ये हवे बरोबर फुपुसात तंबाखू, धुळ, रासायनिक पदार्थ इत्यादी चे छोटे–छोटे कणही जातात त्यामुळे फुपुस कमजोर होतात. या आजाराचे वेळेवर उपचार न केल्यास मुलाचा जीव देखील जाऊ शकतो. असे मोठे आजार नाही जरी झाले तरीही मुलांचे शरीर अशक्त होते आणि जेव्हा ते मोठे होतील तेव्हा शारीरिक कष्टाचे काम ते करू शकणार नाहीत. नंतर कितीही औषधोपचार केला व कितीही पैसे घालवले तरीही ते सशक्त होत नाहीत. अशा मुलांची या ना त्या कारणाने कमी वयामध्ये मृत्यू होतो. म्हणूनच जे लोक मुलांना कामावर ठेवतात, त्यांना कठोर शिक्षेची तरतूद केलेली आहे.[२८]
१८९६ च्या कायद्यानुसार १४ वर्षाखालील कामगारांना बालकामगार म्हटले जाते तर देशात २००२ मध्ये केलेल्या लहान मुलांची काळजी व संरक्षण या कायद्यानुसार १८ वर्षाखालील मुलांना कामगार म्हणता येत नाही.
बालकामगार (प्रतिबंध आणि नियमन) कायदा १९८६ मध्ये सुधारणा करणारे विधेयक जुलै २०१५ मंजूर झाले.[२९]
त्यानंतर आठवडयानंतर लोकसभेनेही त्या विधेयकावर शिक्कामोर्तब केले. बाल कामगारा संबधीची नियमावली शीर्षकातील बालकामगार कायद्यासोबतच १९४८ चा कारखान्यासाठीचा कायदा १९५२ चा खाणी संबधीचा कायदा, २००० सालचा जुव्हेनाईल जस्टिस ऑफ चिल्ड्रेन कायदा व २००९ सालच्या मुलांच्या मोफत आणि सक्तीच्या शिक्षणासबंधी हक्काबद्लच्या कायद्यात कमी अधिक प्रमाणात अंतर्भूत केली गेलेली आहे. १९८६ सालच्या बालकामगार बंदी कायद्याने १४ वर्षाखालील बालकामगारांना ८३ घातक उद्योगात गुंतवण्याला बंदी घातली, होती ही यादी सुरूवातीला १४ व्यवसायापुरतीच मर्यादीत होती. पण २०१५ च्या विधेयकातील बदलामुळे हीच यादी आता चारवर (विडया वळणे, पापड लाटणे, बिंदी, बांगडया अगरबत्या तयार करणे, मालाचे पॅकिंग करणे) आली आणि १४ व्यवसाना सवलत दिली गेलेली आहे.
यामध्ये विशेष बाब म्हणजे अनेक सामाजिक संस्था, नोबेल विजेते कैलाश सत्यार्थी सारखे कार्यकर्ते, काही संसद सदस्य अशा अनेकांचा या विधेयकातील तरतुदींना असलेला विरोध मोडून काढत राज्यसभेने कायदा मंजूर करून घेतला.

या कायद्यामध्ये १४ वर्षाखालील मुलांना कोणत्याही उद्योग व्यवसायामध्ये काम करण्यास मनाई आहे. मुलांना कामावर ठेवणे हा दखलपात्र गुन्हा आहे आणि यासाठी सहा महिने ते दोन वर्षापर्यंत तुरूंगवास किंवा २० ते ५० हजारापर्यंत दंड असे या नव्या कायद्याचे स्वरूप आहे. याशिवाय १४ ते १८ वयोगटातील मुलांनाही कायद्याच्या कक्षेत आणण्यात आले आहे. या बाबी खरोखरच चांगल्या आहेत. पण पुढे असे स्पष्ट करण्यात आले की, मुलांना शाळेच्या वेळे व्यतिरिक्त घरच्या व्यवसायात, उद्योगात काम करण्यास मात्र या कायद्याने परवानगी दिली आहे. फक्त बालकामगारांच्या कुटुंबाना तो व्यवसाय वारसा हक्काने त्यांच्याकडे आल्याचे सिध्द करावे लागणार आहे. यामध्ये विडया वळणे, पापड लाटणे, बिंदी, बांगडया अगरबत्या तयार करणे, मालाचे पॅकिंग करणे अशा विविध घरगुती उद्योगाचा त्यात समावेश करण्यात आलेला आहे. ही कामे घरगुती पातळीवर कंत्राटाने दिली जातात आणि मुलांना त्या कामाला लावले जाते. यामध्ये कंत्राटदाराचा फायदा होईल व मुलांचे मात्र शोषण होईल. म्हणजे शाळे व्यतिरिक्त च्या वेळेत गरीब घरच्या मुलांनी अभ्यास, खेळ मनोरंजन इत्यादी न करता कामच करावे असेच अपेक्षित आहे. यामुळे आजपर्यत जे उद्योग मुलांना घातक होते, त्या उद्योगामध्ये ही या कायद्याचा आधार घेऊन कारखानदार मुलाला काम देऊ शकतात. वीटभट्टीपासून बांधकामापर्यंतच्या उद्योगात या मुलांना सहजी जुंपता येणार आहे. [३०–३३]

आज हजारो मुल काम करतात. पण बालकामगार विषयक खटले आणि दोषीचे प्रमाण अतिशय कमी आहे. २०११ च्या जनगणनेनुसार एक कोटीपेक्षा जास्त मुले (५ ते १४ वर्ष वयोगट) बालकामगार म्हणून काम करत आहेत. सुटका केलेल्या मुलांच्या पुर्नवसानबद्लही कोणतेही ठोस धोरण अमलात आणले जात नाही.[३४]

बालकामगार ही एक ज्वलंत व गंभीर समस्या आहे. शासन व सबंधित विभागाची उदासीनता अनास्था यामुळे ही समस्या जटिल होत आहे.[३५] देश स्वतंत्र झाल्यानंतर ४० वर्षानी म्हणजे १९८७ मध्ये बालकामगारांच्या संदर्भात राष्ट्रीय धोरण निश्चित करण्यात आले. १४ ऑगस्ट १९८७ मध्ये राष्ट्रीय बालकामगार धोरणास संसदेत तत्वत: मान्यता देण्यात आली. त्यालाही २९ वर्ष होऊन गेले. तरीही समस्येचे निर्मुलन झाले नाही. आपल्याकडे अस्तित्वात असलेला 'दी चाईल्ड लेबर प्रोहिबिशन अॅड रेग्युलेशन अॅक्ट' हा १९८६ चा कायदा त्यातील रेग्युलेशन म्हणजे प्रतिबंध ही दुय्यम प्राथमिकतेची बाब आहे. त्यामुळे संपूर्ण कायदा, न्यायव्यवस्था, प्रशासन, शासन बालमजुरीचे संपूर्ण निर्मुलन करण्यात अयशस्वी ठरली आहे.[३६]

बालहक्कांना जर महत्व प्राप्त करावयाचे असल्यास सरकारने फक्त कायद्याची अंमलबजावणी न करता प्रत्यक्षात बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. १२ जून हा बालकामगार दिन म्हणून ओळखला जातो. १८ वर्षाखालील शारीरिक, मानसिक आणि भावनिक विकासावर परिणाम होईल अशी काम करणारी मुलं म्हणजेच बालकागार होय. बालकामगार कायदा १९८६ आणि जुलै २०१५ (दुरूस्ती) नुसार १४ वर्षाखालील मुलाला कामावर ठेवणा–या व्यक्तीवर कारवाई होते. बाल न्याय अधिनियमनानुसार १८ वर्षाखालील मुलांना कामावर ठेवणे हा गुन्हा आहे. भारत सरकारने मुलांना ५४ प्रकारचे अधिकार दिले आहेत. संयुक्त राष्ट्राच्या सभेत भारत सरकारने तसे मान्य देखील केले आहे. या अधिकांरात मुलांना जगण्याचा अधिकार, सहभागतेचा अधिकार, विकासाचा

अधिकार, सुरक्षिततेचा अधिकार म्हणजेच सर्व प्रकारच्या शोषणापासून मुक्तता या अधिकारांचा समोवश केला आहे.[३७]

**संदर्भ ग्रंथसूची**


१. बालमजूरी निर्मूलन प्रकल्प, बालहक्क कक्ष संशोधन व लेखन विभाग यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे, पृष्ठ क्रमांक ३

२. डॉ. शेख आर. के. (२०१४), 'बालकामगार समस्या व समाधान,' प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, पृष्ठ क्रमांक ९८

३. Kulshreshtha, J.c: Indian child labour, uppal publishing House, New Delhi, 1994 p.n.76-77

४. डॉ. शेख आर. के. (२०१४), 'बालकामगार समस्या व समाधान,' प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, पृष्ठ क्रमांक ३

५. तत्रैय पृष्ठ क्रमांक ९९

६. तत्रैय पृष्ठ क्रमांक ९९–१००

७. सर्वजीत यादव, (२०१४), 'भारतीय समाज एवं बालश्रम' नील प्रकाशन, जयपुर, पृष्ठ क्रमांक १९३ –१९४

८. डॉ. सुशील कुमार छिल्लर आणि डॉ. मंजुलता (२०१३), 'भारत में बालश्रम: समस्याएँ एवं समाधान' राहुल पब्लीशंग हाऊस ,शास्त्रीनगर, मेरठ (यू.पी.) पृष्ठ क्रमांक १०९

९. तत्रैय पृष्ठ क्रमांक ११०

१०. डॉ. शेख आर. के. (२०१४), 'बालकामगार समस्या व समाधान,' प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, पृष्ठ क्रमांक १००–१०१

११. बालमजूरी निर्मूलन प्रकल्प, बालहक्क कक्ष संशोधन व लेखन विभाग, यशवंतराव चव्हाण विकास प्रकाशन प्रबोधिनी, पुणे पृष्ठ क्रमांक–२१

१२. (Govt.India, ministry of law and justice: the' factory Act, 1948, the controller of publications, Delhi 1989 P-41)

१३. डॉ. अंजली जोशी–टेंभुर्णीकर (२००७), 'असंघटित क्षेत्रातील बालकामगार,' डॉ. बा. ल. जोशी पब्लिकेशन्स, औरंगाबाद पृष्ठ क्रमांक २४

१४. डॉ. सुशील कुमार छिल्लर आणि डॉ. मंजुलता (२०१३), 'भारत में बालश्रम: समस्याएँ एवं समाधान' राहुल पब्लीशंग हाऊस ,शास्त्रीनगर, मेरठ (यू.पी.) पृष्ठ क्रमांक १२०

१५. डॉ. अंजली जोशी–टेंभुर्णीकर (२००७), 'असंघटित क्षेत्रातील बालकामगार,' डॉ. बा. ल. जोशी पब्लिकेशन्स, औरंगाबाद पृष्ठ क्रमांक २५

१६. डॉ. सुशील कुमार छिल्लर आणि डॉ. मंजुलता (२०१३), 'भारत में बालश्रम: समस्याएँ एवं समाधान' राहुल पब्लीशंग हाऊस ,शास्त्रीनगर, मेरठ (यू.पी.) पृष्ठ क्रमांक १२२–१२३

१७. तत्रैय पृष्ठ क्रमांक १२३–१२४

१८. डॉ. अंजली जोशी–टेंभुर्णीकर (२००७), 'असंघटित क्षेत्रातील बालकामगार,' डॉ. बा. ल. जोशी पब्लिकेशन्स, औरंगाबाद पृष्ठ क्रमांक २५

१९. बालमजूरी निर्मूलन प्रकल्प, बालहक्क कक्ष संशोधन व लेखन विभाग यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी पुणे पृष्ठ क्रमांक २०

२०. तत्रैय पृष्ठ क्रमांक १५–१९

२१. बालकांचे कायदे, (२०१५) श्री. नि. सबनीस मुकुन्द प्रकाशन, ठाणे जानेवारी पृष्ठ क्रमांक ३

२२. त्रतैय पृष्ठ क्रमांक २१९

२३. त्रतैय पृष्ठ क्रमांक ६२–६७

२४. त्रतैय पृष्ठ क्रमांक २२७–२३०

२५. The Gazette, India, Part-II Section-I, New Delhi, Friday, January 1,2016/ Pausha 11, 1937 Page No. 33.

२६. Kanbergi Ramesh (1991), ' child labour in India: The Problem and the prospects,' Ashish Publishing House, New Delhi, page no.57

२७. Report of the committee on child labour, 1979 P-7

२८. .hi.Vikaspedio.in/education|child.rights|child-labour-17/11/16

२९. http://nihmumbai gov in/serints/detail http://prahaar. In/business/12 July 2915 Author सई कुलकर्णी

३०. लोकसत्ता दिनांक २८ जुलै २०१६ पृष्ठ क्रमांक ९

३१. http://prahar.in/india/14 may, 2015

३२. http:www.ibnlokmat office website june12, 2009

३३. http: www loksatta.comdesh.videsh news may 14, 2015

३४. Phahar-Online Marathi news 4 January 2015.

३५. लोकमत – १५ डिसेंबर २०१५ पृष्ठ क्रमांक ३

३६. http://www divyamarathi.bhaskar.com jun12,2012 प्रा.विलास बेत

३७. Solapur News Portal Livenews. Com.